# विज्ञाननिष्ठ निबंध

(भाग १ व २ एकत्रित)

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**विज्ञाननिष्ठ निबंध : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# विज्ञाननिष्ठ निबंध

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव | ... | ७ |
| अीश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय? | ... | १६ |
| खरा सनातन धर्म कोणता | ... | २७ |
| यज्ञाची कुळकथा | ... | ३९ |
| गोपालन हवे, गोपूजन नव्हे ! | ... | ६८ |
| साधुसंतांचे बोलपट कसे पहावे? | ... | ८३ |
| लोकमान्यांच्या आठवणी कशा वाचाव्यात? | ... | ९७ |
| दोन शब्दांत दोन संस्कृती | ... | १०६ |
| आजच्या सामाजिक क्रांतीचे सूत्र | ... | ११९ |
| पुरातन की अद्यतन? | ... | १३२ |
| यंत्र | ... | १३८ |
| यंत्राने का बेकारी वाढते? | ... | १५२ |
| 'न बुद्धिभेदं जनयेद्' म्हणजे काय? | ... | १६४ |
| जर का आज पेशवाअी असती ! | ... | १७४ |
| आमच्या धर्मभावना दुखवू नका अं ! | ... | १९० |
| धर्मवेडाची नांगी ठेचू शकेल – विज्ञानबळ | ... | २०२ |
| ॐकाराची अुपपत्ति आणि गजाननाची मूर्ति | ... | २१३ |
| जेथें तेथें अखिल हिंदू गणपति स्थापा ! | ... | २२४ |
| सहस्यकार आणि अुपयुक्ततावाद | ... | २३६ |
| पुनर्जन्माची अेक चमत्कारिक पण विचारार्ह घटना | ... | २४३ |
| भारतीय पंचांगाचे सूतोवाच | ... | २५४ |
| ही खिलाफत म्हणजे आहे तरी काय? | ... | २६२ |


✦✦

# मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव

वाहत्या नदीत काठी आपटली असता त्या नदीच्या अखंड धारेचे पळभर दोन भाग झालेले भासतात. संध्याकाळी अंधुकलेल्या अखंड आकाशात मध्येच कुठे जी पहिली चांदणी लुकलुकू लागते ती तशी चमकण्यासरशी, ह्या अखंड आकाशाला अेक गणनबिंदू मिळून त्याच्या चारीकडे चार बाजू चट्‌कन वेगळ्या झाल्याशा भासतात.

ह्या पदार्थजातांतही मनुष्याच्या जाणिवेची चांदणी चमकू लागताच त्याचे अकस्मात दोन भाग पडतात. अुभे विश्व, अनंताच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत चरकन् कापले जाअून दुभंग होअून पडते. सुरूप आणि कुरूप, सुगंधी आणि दुर्गंधी, मंजुळ आणि कर्कश, मृदुल आणि कठोर, प्रिय आणि अप्रिय, चांगले आणि वाअीट, दैवी आणि राक्षसी, ही सगळी द्वंद्वे मनुष्य हा ह्या यच्चयावत् विश्वासा, वस्तुजाताचा, केंद्र कल्पिल्यामुळेच, मध्यबिंदू समजला जाताच, अकस्मात अुत्पन्न होतात. मनुष्यास जो सुखद तो विश्वाचा अेक भाग, मनुष्यास जो दुःखद तो दुसरा. पहिला चांगला, दुसरा वाअीट.

ज्याने विश्वाचा मनुष्यास सुखद होणारा हा चांगला भाग निर्मिला तो देव, मनुष्यास दुःख देणारा तो दुसरा वाअीट भाग निर्मिला तो राक्षस.

मनुष्याच्याच लांबीरुंदीचा गज घेअून विश्वाची अुपयुक्तता, बरेवाअीटपणा, मोजला असता ह्या मोजणीचा हा निकाल फारसा चुकत आहे असे काही म्हणता येणार नाही.

विश्वाची अुपयुक्तता आपल्या मापानेच अशी मापावी हेही अपरिहार्यच होते. विश्वाचे रसरूपगंधस्पर्शादि सारेच ज्ञान मनुष्याला त्याच्याशी असलेल्या पाच ज्ञानेंद्रियांनीच काय ते कळू शकणार. विश्वासातील वस्तुजात अेकेकी गणून, तिचे पृथःकरण करून, ते घटक पुन्हा मोजून त्या अमर्याद व्यापाची जंत्री करीत राहिल्याने, विश्वाच्या असीम महाकोषातील वस्तुजाताचे मोजमाप करणे केवळ अशक्य असे समजून आपल्या प्राचीन तत्वज्ञान्यांनी, आपल्या पांच ज्ञानेंद्रियांनीच ज्या अर्थी हे सर्व विश्व केव्हाही जे काही आकळले जाअू शकणारे आहे ते जाअू शकते, त्या अर्थी त्यांचे 'पंचीकरण' करणे हाच वर्गीकरणाचा अुत्कृष्ट मार्ग होय असे जे ठरविले ते अेका अर्थी क्रमप्राप्तच होते. अितकेच नव्हे, तर तो त्यांच्या अप्रतिम बुद्धिमत्तेचा त्या काळचा अेक आश्चर्यकारक विजयच होता! ज्ञानेंद्रियेच जर पांच तर विश्वाचे यच्चयावत् वस्तुजात त्यांच्या त्या पांच गुणांपैकी कोणत्यातरी अेका वा अनेक गुणांचेच असणार. अर्थात, त्या पाच गुणांच्या तत्त्वांनी, पंचमहाभूतांनीच, ते घडलेले असणार. ह्या विश्वदेवाचा आम्हांशी जो काही संवाद होणे शक्य आहे तो ह्या त्याच्या पाचमुखांनीच काय तो होणार म्हणूनच तो विश्वदेव, तो महादेव पंचमुखी होय!

आपल्या ज्ञानेद्रियांनी विश्वाच्या गुणधर्माचे आकलन करण्याचा मनुष्याचा हा यत्न जितका अपरिहार्य नि सहज, तितकाच स्वतःच्या अंतःकरणाने त्या विश्वाला निर्मिणाऱ्या देवाच्या अंतःकरणाची कल्पना करण्याचा मनुष्याचा यत्नही साहजिकच होता. त्यातही मनुष्याला सुख देण्यासाठीच कोण्या दयाळू देवाने ही सृष्टि निर्मिली असली पाहिजे, ह्या मानवी निष्ठेला अत्यंत प्रबळ असा पाठिंबा ही सृष्टिदेवीच प्रतिपदी, प्रतिपली तिला तशी लहरच आली की सारखी देत राही, आजही देतेच आहे!

खरोखर, मनुष्याच्या सुखसोयीसाठी त्या दयाळू देवाने ही सृष्टीची रचना किती ममताळूपणाने केली आहे पहा! हा सूर्य, हा समुद्र, किती प्रचंड ही महाभूते! पण मनुष्याच्या सेवेस त्यांना देखील त्या देवाने लावले. दुपारी तहान तहान करीत मुले खेळून दमून येतील तेव्हा थंडगार नि गोड पाणी मिळावे म्हणून आअी सकाळीच विहिरीचे पाणी भरून 'कुज्यां'त घालून गारत ठेवते, तशी ममतेने अुन्हाळ्याने नद्या सुकून जाण्याच्या आधीच हा सूर्य त्या समुद्रातले पाणी किरणांचे दोर खोलखोल सोडून भरतो, मेघांच्या 'कुज्यां'तून ठेवतो, आणि तेही मध्यंतरी अशी काही हातचलाखी करून, की समुद्रात असताना तोंडी धरवेना असे खारट असणारे ते



पाणी किरणांच्या कालव्यांतून त्या आकाशाच्या विस्तीर्ण सरोवरांत साचताच अितके गोड नि गार व्हावे की जे पाणी पिण्यासाठी देवांच्याही तोंडास पाणी सुटावे! पुन्हा समुद्राचे खारट पाणी माणसासाठी गोड करून देण्याच्या धांदलीत साराचा सारा समुद्र गोड करून टाकण्याची भलतीच चुकीही न होअील अशी तो दयाळू देव सावधगिरीही घेववितो– अेका वर्षात हवे तितकेच पाणी गोड करून आटविण्याअीतकीच शक्ती सूर्यकिरणांत आणि साठविण्याअीतकीच शक्ती मेघांत ठेविली जाते. नाहीतर, सारा समुद्रच गोड झाल्याने मनुष्यास मीठ मिळणे बंद होअून त्यांचा सारा संसार अळणी व्हावयाचा!

हे पशू पहा! मनुष्यांच्या सेवेला आणि सुखाला हवे तसेच विविध, हवे तितकेच बुद्धिमान, वाळवंटातील ते मनुष्याचे तारू म्हणून काटे खाअून पाण्यावाचून महिनोगणती चालण्याची युक्ति त्या अुंटाला शिकविली. तो घोडा किती चपल! त्याच्यावर स्वारी भरणाऱ्या मनुष्यास भर रणांगणातही संभाळून वहाण्याअीतकी नि मनुष्याशी अत्यंत प्रामाणिकपणे वागण्याअीतकी बुद्धी त्याला देवाने दिली. पण मनुष्यावरच स्वारी भरण्याअीतकी बुद्धी मात्र दिली नाही! ही गाय पहा. अेका बाजूला सुके गवत ढकलावे नि दुसऱ्या बाजूला त्याचे बनलेले ताजे ताजे जीवनप्रद दूध चरव्या भरभरून काढीत बसावे! असे ते आश्चर्यकारक रासायनिक यंत्र ज्या देवाने घडविले तो खरोखरेच किती दयाळू असला पाहिजे! आणि पुन्हा प्रत्येक वेळी जुने यंत्र मोडताच नवे घडण्याचे श्रमसुद्धा मनुष्याला पडू नयेत अशी सोय त्यातच केलेली, पहिल्या यंत्रातच गवताचे दूध करून देता देताच तसलीच नवीन अजब यंत्रे बनविण्याचीही व्यवस्था केलेली!

अेक गव्हाचा दाणा पेरला की त्याचे शंभर दाणे ज्या जगात होअून अुटतात, अेक आंबा! रसाने, स्वादान, सत्त्वाने कोण भरपूर भरलेले ते देवफळ! पण तरीही ते अितके सुपीक की अेक आंबा रुजविला की त्याचा वृक्ष होअून प्रतिवर्षी हजार हजार आंबे त्याला लागावे नि असा क्रम वर्षानुवर्षे चालावा, फार काय सांगावे, अेका आंब्याच्या फळापासून होणारी ती लाखो फळे सगळीच्या सगळी जरी मनुष्यांनी खाल्ली तरी पुन्हा आंब्याचा तोटा म्हणून पडूच नये, यासाठी आंब्याच्या झाडाच्या फांदीचींच कलमे करून त्यांच्या आंबरायांच्या आंबराया भरभराटण्याची सोय ज्या जगात देवाने केलेली आहे, अेका कणाचा मण होणारी ही तांदूळ, बाजरी, जोंधळे

प्रभृति नानाविध सत्त्वस्थ धान्ये, अेक बी पेरले की अेका पिढीस सहस्रावधी रसाळ फळे पुरविणारी ही फळझाडे, हे फणस, पपनस, अननस, द्राक्षे, डाळिंबे या गवतासारख्या अुगव म्हणताच अुगवणाऱ्या अति रुचकर बहुगुणी, विविधरस शाकभाज्या, फळभाज्या, फळभाज्या, ज्या जगात पुरून अुरताहेत, ज्याचा गाभाच गोड आहे, तो साखरेच्या पाकाने ओतप्रोत भरलेला अूस देखील त्या जगात अितका पिकतो की त्याचे मळेचे मळे माणसांना नकोसे झाले म्हणजे बैल खाअून टाकतात. त्या जगास निर्मिण्यात देवाने मनुष्यावर जी अमर्याद दया केली आहे तीविषयी मनुष्या त्याचा अुतराअी होणार तरी कसा!!

तशीच ही मनुष्याच्या देहाची रचना! पायाच्या तळव्यापासून तो मज्जांतील सूक्ष्मातिसूक्ष्म पिंडानुपिंडापर्यंत ह्या शरीराची रचना मनुष्याला सुखदायी होअील अशीच सुसंवादी करताना हे मनुष्याच्या देवा, तू जी केसानुकेसागणीक काळजी घेत आला आहेस ती कुठवर सांगावी! मनुष्याचा हा अेक डोळा जरी घेतली तरी, किती युगे, किती प्रयोग, किती अनवरत अवधाने करून तू हा आज आहे तसा घडवू शकलास! प्रथम प्रकाशाला किंचित संवादी असा अेक नुसता त्वग्बिंदू, प्रकाशाला नव्हे तर त्याच्या सावलीला तेवढा जाणणारा, अंधेर नि अुजेड अितकाच फरक काय तो जाणणारा तो पहिला त्वग्बिंदू, त्याच्यात सुधारणा करता करता किती प्रयोग करून, किती रद्द करून, पुन्हा प्रयोग रचता रचता शेवटी आज मनुष्याचा सुंदर, टपोरा, पाणीदार, महत्त्वाकांक्षी डोळा तू घडविलास! अितकाच महत्त्वाकांक्षी डोळसपणा त्या मनुष्याच्या डोळ्यात मुसमुसत आहे की, देवा, तुझ्याच कलेत तुझाच पाडाव करण्यासाठी दुर्बिणीचे प्रतिनेत्र निर्मून तो तुझ्या त्या आकाशातील प्रयोगशाळेचेच अंतरंग पाहू अिच्छित आहे! नव्हे, तुलाही त्या दुर्बिणीच्या टप्प्यात गाठून कुठेतरी प्रत्यक्ष पाहता येते की नाही याचे प्रयोग करू म्हणत आहे.!!!

आणि त्या मनुष्याच्या डोळ्यास प्रसादविण्यास्तव सौंदर्याचा नि सुरंगाचा जो महोत्सव तू त्रिभुवनात चालू केलास त्याची आरास तरी काय वर्णावी? हे पारिजातकाचे सुकोमल फूल, ते सोनचाफ्याचे सुवासमत्त सुमन! हा मोराचा पिसारा पहा, अेकेका पिसाची ती ठेवण, ते रंगकाम, ती जिवंत चमक, ते तरल नटवेपण! आद्य कलावंत! तशा अनेक सुंदर पिसांचा तो पिसारा पसरून तो तुझा मोर जो जो आनंदाने अुन्मत होअून नाचू लागतो तो तो देवा, तुझी ललित कलाकुसरी पाहून



'धन्य, देवा, धन्य तुझी! वारे वा! असे वारंवार अुद्गारत माझे हृदयही नाचू लागते! आणि असा पिसारा मनुष्यासही तू का दिला नाहीस म्हणून किंचित रुसूही लागते! हे नयनाल्हादक रंगाचे नि श्रवणाल्हादक गोड लकेऱ्या घेणारे शतावधी पक्ष्यांचे थवेच्या थवे ज्या जगात मंजुळ आनंदाचे किलबिलाट करीत आहेत, गुलाब, चमेली, बकुळ, जाअीजुअी चंपक, चंदन, केतक, केवड्याची बनेची बने सुंदर फुलांचे सडे पाडीत आहेत आणि सुगंधाने सारा आसमंत दरवळून सोडीत आहेत. माणसातून ह्या प्रीतिरती आणि मानससरोवरातून ह्या कमलिनी, कुमुदिनी विकसत-विलसत आहेत, ज्या जगात रात्री चांदण्या आहेत, अुषःकाल गुलाबी आहेत, तारुण्य टवटवीत आहे, निद्रा गाढ आहे, भोगांत रुची आहे, योगांत समाधी आहे - देवा ! ते हे जग ज्या तू आम्हा मनुजांना अितके सुखमय होअू दिलेस, होअू देत आहेस, त्या तू ते आमच्या सुखासाठीच असे निर्मिलेस असे आम्हास का वाटू नये? आम्हाला जशी आमच्या लेकरांची माया आहे म्हणूनच आम्ही त्यांना त्यांच्या सुखासाठी जपतो तसेच आमच्या सुखासाठी अितके जपणाऱ्या देवा, तुला आम्हा मनुष्यांची माया असलीच पाहिजे. आम्ही माणसे, देवा तुझी लेकरे आहोत. तू आमची खरी आअी आहेस! आअीला देखील दूध येते. तू दिलेस म्हणून! आम्ही मनुष्य तुझे भक्त आहोत, आणि देवा तू आम्हा मनुष्यांचा देव आहेस.

अितकेच नव्हे, तर तू आम्हा मनुष्यांचाच देव असून तुझ्यावाचून दुसरा देव नाही! हे सारे जगत् तू आणच्या सुखसोयीसाठीच घडविले आहेस!

मनुष्याच्या अिच्छेस जुळेशी ही विचारसरणी सत्यास जुळेल अशीही ठरली असती- जर या जगातील प्रत्येक वस्तू नि प्रत्येक वस्तुस्थिती मनुष्याला सुखकारक नि अुपकारक अशीच असती तर! पण मनुष्याच्या दुर्दैवाने या साऱ्या जगातील तर राहोतच, पण ज्या पृथ्वीस तो मनुष्य प्रथम प्रथम तरी 'सारे जग' म्हणून स्वाभाविकपणेच संबोधित होता, जिला विश्वंभरा, भूतधात्री, अशा नावाने तो अजूनही गौरवितो, त्या पृथ्वीवरील वस्तुजातही वा वस्तुस्थितिही मनुष्यास सर्वस्वी अनुकूल नाही, अितकेच नव्हे, तर अुलट अनेक प्रकरणी मारकच आहे.

ज्या सूर्याचे नि समुद्राचे मनुष्यावर झालेले अुपकार आठवून आठवून आताच त्याची स्तोत्रे गाअीली तो सूर्य नि तो समुद्रच पहा! अुन्हाने तापून चक्कर येअू लागलेल्या अवश वाटसरूवर, लाठीच्या पहिल्या दोनचार तडाख्यांनी अर्धमेला होअून गेलेल्या